"Education for Knowlege, science and culture."


— Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe.

VIVEKANAND COLLEGE DEPARTMENT OF GEOGRAPHY KOLHAPUR

# Vivekanand college, Kolhapur. (Autonomous)

## Department of Geography


is Celebrating



# GEOFEST WEEK-2021

## Essay writing

Impact of covid-19 on Environment




Name - Gayatri Anil Tawade.

Std - S.Y.B.A

Roll No - 5255

Head
DEPARTMENT OF GEOGRAPHY
VIVEKANAND COLLEGE,
KOLHAPUR.

Scanned with OKEN Scanner

# कोरोनाचे पर्यावरणावर झालेले परिणाम

"नको-नको इतकी
घाई करू
कोरोनाला तुमच्या
जवळ आणू
मार्क आणि मास्कची
आहे परिक्षा
घरीच सुरक्षित रहा
एवढीच अपेक्षा."

आपण असं म्हणत जवळ-जवळ वर्ष 2020 घालवले आहे. कारण कोरोनाने सर्वत्र अहंकार केला होता. कोरोना-व्हायरस प्रथम १९६० च्या दशकात सापडले. सर्वात आधी सापडलेल्यांमध्ये कोंबड्यांमध्ये एक संसर्गजन्य ब्रॉन्काय-टीस विषाणू आणि सामान्य सर्दी असलेल्या दोन रूग्णांमध्ये (नंतर ह्युमन कोरोनाव्हायरस २२E आणि ह्युमन कोरोना-व्हायरस ओसी असे नाव देण्यात आले) होते. २००३ मध्ये सार्स-सी ओव्ही, एच सी ओव्ही आणि २०१९ मध्ये एस-ए-आर-कोव्ही-२ या कुटुंबातील अन्य सदस्यांची ओळख पटली आहे. यामध्ये गंभीर श्वसनमार्गाचे संक्रमण होते.

२०२० मध्ये आपल्या महाराष्ट्रात कोरोना विषाणूचा उद्रेक झाला. महाराष्ट्रातील जनजीवनावर त्याचप्रमाणे सजीव-निर्जिव गोष्टींवर यांचे फार मोठे परिणाम झाले. राज्यात लागू झालेल्या नियम व अटी यांचे पालन करणे सक्तीचे होतेच त्याचप्रमाणे घरी राहून सुरक्षित स्वतःला ठेवणे महत्वा-चे होते. १५ जून २०२० पर्यंत १,१०,७४४ जणांना याची लागण झाली असून त्यापैकी ४,१२८ जणांचा मृत्यू झाला आणि ५६,०४९ लोक बरे झालेले आपल्याला दिसून येतात पण सर्वत्र हालचाल झाली व जनजीवन विस्कळीत झाली अशा अनेक गोष्टींवर कोरोनाचे आपल्याला चांगले-वाईट परिणाम दिसून आले.

प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. त्याचप्रमाणे माझ्या दृष्टीने या कोरोना विषाणूने त्याचे दोन्ही बाजू आपणास दाखविल्या आहेत. एका बाजूने तो जरी आपणास शाप ठरत असताना, त्याची दुसरी बाजूही आपण लक्षात घेणे गरजेचे आहे. मी या दोन्ही बाजूंचा विचार करूनच हा निबंध लिहत आहे. मागील काही महिन्यापासून मी जेव्हा या भयानक कोरोना विषाणूवर विचार करीत आहे तेव्हा मला अनेक गोष्टी समजल्या. या कोरोना विषाणूने मात्र जगातील सर्व मनुष्यजातीला काही प्रचंड शिक्षा आणि शिकवण व बऱ्याच गोष्टींची आठवण करून दिली आहे. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

सर्वात महत्वाचे उदाहरण म्हणजे कोरोनाचा निसर्गावर झालेला परिणाम होय.

"कुठे ओझोनच्या थराला पडलेलं
भोक भरून यायला लागलं,
तर कुठे हवेतलं प्रदूषण निवळून
वातावरण स्वच्छ झालं,
जालंधरसारख्या शहरांना तर
हिमालयाचं दर्शन घडलं"

माझ्या छोट्या कवितेतून मी स्पष्ट होण्याचा प्रयत्न केला. पण अगदीबरोबर निसर्गाला मोठ्या प्रमाणात चालना त्याचप्रमाणे पोषक वातावरण मिळाले. माणसाप्रमाणे मुकी जनावरे व पक्षी मुक्तपणे संचार करू शकले. मानवाच्या अनेक गोष्टीमुळे दुर्मिळ झालेले पक्षी पुन्हा दिसू लागले. त्याच्या अनेक जाती-प्रजाती आपल्याला वाढे दिसून आली.

एकीकडे हे होत असताना दुसरीकडे याच पर्यावरणातल्या एका घटकाकडून दुसऱ्याकडे आलेल्या एका विषाणूने जगभर थैमान घातलय. पर्यावरणाचा आणि आपल्या आयुष्याचा किती जवळचा संबंध आहे, हे या जागतिक साथीदरम्यान सगळ्यांच लक्षात आले. एक महत्वाची बाब म्हणजे जागतिक पर्यावरण दिन हा 5 जूनला साजरा करण्यात येतो. पर्यावरणाचे महत्व पटवून देणारा हा दिवस दरवर्षी वृक्षारोपणासारखे विविध कार्यक्रम आयोजित करून साजरा केला जातो. हा दिन साजरा करण्यामागचा मुख्य हेतू म्हणजे पर्यावरणाशी निगडीत असलेले विषय, घटक आणि समस्या यांच्याकडे सर्वांचे लक्ष वेधून त्याबद्दल जागरूकता निर्माण करणे.

दरवर्षी यासाठी एक थीमदेखील ठरवलेली असते. या वर्षीची थीम होती 'बायोडायव्हर्सिटी' होय. परंतु यावर्षी आलेल्या कोरोनाच्या संकटामुळे मानवाच्या हस्तक्षेपामुळे पर्यावरणावरील होणारा दुष्परिणाम कमी झालेला आहे. परिणामी काही महिन्यामध्येच कित्येक वर्षांपासून प्रदूषणात पडलेली भर झपाट्याने कमी होण्यास मदत झाली.

मानवाने बुद्धीच्या जोरावर पर्यावरणावर आपले वर्चस्व गाजवता - गाजवता त्याला पर्यावरणाचा दर्जा टिकवून ठेवण्यात अपयश आल्याचे वारंवार दिसून आले आहे. दिल्ली, मुंबई, पुणे यासारख्या मोठ्या शहरांमध्ये प्रदूषणामुळे गंभीर समस्या व परिणाम पाहायला मिळतात. आज जगभरात कोरोनाने दहशत माजवली असताना दुसरीकडे पर्यावरणावर त्याचा सकारात्मक परिणाम झालेला दिसून येत आहे.

- वाढती लोकसंख्या, औद्योगिकरण, बदलती जीवनशैली याचा थेट परिणाम पर्यावरणावर होतो. लॉकडाऊनमुळे प्रवास, उद्योगधंदे ठप्प पडले. आणि पाहता-पाहता हवेतील प्रदूषण कमी झाले. हवा शुद्ध झाली. अनेकांनी सोशल मीडियावर लॉकडाऊन पूर्वी आणि लॉकडाऊन दरम्यानचे फोटोज शेअर केले ते पुरावा देतात. मानवाने योग्य प्रमाणात हस्तक्षेप केल्यास निसर्ग देखील खुलतो हेच यावरून स्पष्ट होते.

आता येती ती म्हणजे नाण्याची दुसरी बाजू कोरोनामुळे निसर्गावर झालेले दुष्परिणाम होय. जी जनावरे माणसांवर आधारित असतात अथवा माणसाळलेली असतात त्या जनावरांना लॉकडाऊनमुळे मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागला उदा:- भटकी कुत्री, भटक्या गायी अशा प्राण्यांचे खाण्याचे हाल मोठ्या प्रमाणात झाले. कोरोनावर लस उपलब्ध लवकर होत नसल्यामुळे त्याचप्रमाणे हा संसर्गजन्य रोग असल्यामुळे लोकांच्या मृत्यूचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत गेले त्यामुळे लोकसंख्येमध्ये आपल्याला मोठी तफावत जाणवली म्हणजे जन्मदर आणि मृत्युदर यांची सांगड घालणे अवघड झाले.

कोरोनामुळे मृत्यूमुखी पडलेल्या लोकांचे देह त्यांच्या नातेवाईकांकडे देत नसल्याने त्यांचे विल्हेवाट लावण्याची जबाबदारी सरकारी कर्मचाऱ्यांकडे होती. रोजच लोकांचे प्रमाणापेक्षा जास्त मृत्यू होत गेले म्हणून सरकारला 'गॅसदाहिनी' यांचा वापर करावा लागला.

कोरोनामुळे मृत्यु पावलेल्या लोकांचे देह जाळल्यामुळे मोठ्या प्रमाणात हवेत प्रदुषण त्याचप्रमाणे जीवजंतू प्रसरून हवा जास्त प्रमाणात दूषित झालेली दिसून आली. त्याचबरोबरीने हॉस्पीटलचा कचरा यांचे प्रमाण वाढल्यामुळे कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झालेले दिसून आले. अशा प्रकारे कोरोनाचे निसर्गावर चांगले व वाईट परिणाम दिसून आले.

Scanned with OKEN Scanner